# प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली — दिनांक ०६.०५.२०१९

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| कोरची | मौजा खुर्सीपार १५ किमी उत्तर<br>**घटना ता. वेळ :-** दिनांक ०६.०५.२०२० चे ०३.३० वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान | सरकार तर्फे :- सपोनि विक्रांत अ. सगणे नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली आरोपी चे नाव :-१) तरुण उर्फ नितीन निर्मल धमगाये वय २० वर्षे रा.कोरची २) महेश उर्फ गोलु प्रकाश मुंगनकर वय २४ वर्षे रा. मालेवाडा ३) प्रेमसिंग दामोदरसिंह राजपुत वय ४० वर्षे रा. भरतपुर (राजस्थान) ४) मगनसिंग सिताराम राजपुत वय ५४ वर्षे रा. पहाडपुर (राजस्थान) ५) मदन गीयुराम गोटा वय २५ वर्षे रा. मुलेटीपदीकसा जि.गडचिरोली ६) विनोद लालसाय ताडामी वय २५ वर्षे रा.खुर्सीपार जि.गडचिरोली ७) विनोद कुमार शेंडे वय ४५ वर्षे रा. कोरामटोला (छत्तीसगड)<br>पाहिजे आरोपी १) तिलक उंदीरवाडे रा.खुर्सीपार २) सचिन भोयर रा. देसाईगंज |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गोपनिय सुत्रांकडुन दारु साठा तसेच वाहतुकीबाबत** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोनि उल्हास भुसारी, सपोनि विक्रात सगणे, पोउपनि भागवत कदम, सफौ/ दादाजी करकाडे, गंगाधर भोयर, पोहवा/भाउराव बोरकर, हेमंत गेडाम, कान्हु गुरनुले, पोशि/नुतेश धुर्वे, मंगेश राउत, माणिक दुधबळे, सुनिल पुट्टावार, मपोना/ पुष्पा कन्नाके चापोना/सिध्देश्वर बाबर, माणिक निसार स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली | |
| | महाराष्ट्र शासनाने गडचिरोली जिल्ह्यास दारुबंदी जिल्हा घोषीत करुन गडचिरोली जिल्ह्यात दारुसाठा, वाहतुक, विक्री व बाळगण्यास बंदी घातली असल्याने अवैध्य दारुविक्रीस अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध सुगंधीत तंबाखु, अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.<br>स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक ०६.०५.२०२० रोजी स्थानिक | |

| | |
|---|---|
| | गुन्हे शाखेचे सहाय्य पोलीस निरीक्षक विक्रांत सगणे यांना त्यांचे गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, मौजा कोरची येथील दारुविक्रता तरुण निर्मल धमगाये याने त्याचे साथीदारांसह दारुची मोठी खेप परराज्यातुन मागवुन मौजा खुर्सीपार ता.कोरची जिल्हा गडचिरोली येथील त्याचा अवैध व्यवसायातील साथीदार तिलक उंदीरवाडे याचे राहते घरी मोठ्या प्रमाणात दारुचा साठा केला असुन जिल्ह्यातील किरकोळ दारुविक्रेत्यांना त्यांचे मागणीप्रमाणे पुरवठा करीत असतो. सदर माहिती तात्काळ वरीष्ठांना देवुन त्यांचे परवानगीने व मार्गदर्शनात रेड योजना आखण्यात आली. सदर योजनेत मा.श्री.शैलेश बलकवडे पोलीस अधिक्षक गडचिरोली, मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन करुन स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पथक रेड कामी रवाना केले. रेड पथक कारवाई करीता रवाना झाले असतांना त्यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, तरुण धमगाये व त्याचे साथीदार दारुचा साठा दुस-या ठिकाणी स्थलांतरीत करण्याच्या तयारीत आहे. पोलीस पथकाने तात्काळ बातमी मिळालेल्या ठिकाणी योजनाबद्धरीत्या रेड केली असता घटनास्थळावर वरील नमुद आरोपी त्यांचेकडील स्वराज माझदा वाहन क्रमांक सी.जी. ०८ एल २७६८ या वाहनात दारुचे बॉक्स भरतांना मिळुन आले. पोलीस पथकाने योजनाबध्दरीतीने सापळा रचुन ७ आरोपींना घटनास्थळावरुन जेरबंद केले व त्यांचे ताब्यातील देशी दारुचे ५४५ बॉक्स किंमत ५४,५०,०००/- दारु वाहतुकीकरीता वापरलेले दोन वाहन किंमत ६,००,०००/- व आरोपींचे ३ मोबाईल किंमत ७,०००/- असा एकुण जुमला किंमत ६०,५७,०००/- रु. चा माल पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतलेल्या आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन कोरची येथे कायदेशीर तक्रार देवुन आरोपी व मुद्देमाल पोस्टे कोरची यांचे पुढील कार्यवाहीस्तव देण्यात आला.<br>सध्या देशात लॉकडाउन परिस्थिती असतांना आरोपीतांनी परराज्यातुन एवढया मोठ्या प्रमाणात दारुसाठा कसा व कोणाच्या मदतीने आणला याबाबत पोलीस सखोल तपास करीत आहे. एकंदरीत सदरच्या कारवाईने गडचिरोली जिल्ह्यातील अवैध दारुविक्रेत्यांना धडकी भरलेली आहे. |



